महाराष्ट्र पोलीस

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 28/12/2020 (सोमवार)

(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा विर बाग रिसोर्ट ब्रांद्रा येथे दिनांक 26/12/2020 चे 18:00 वा. ते 19.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. कस्तुरी जौ. मंदार मांडे, वय 27 वर्ष, रा. गणेश सोसायटी रचना कॉलनी गोरक्षण रोड अकोला ही पतीसह तुली विरबाग रिसोर्ट बांद्रा येथे फिरण्याकरीता आली होती. फिर्यादी व तिचे पतीसह तुली रिसोर्ट मध्ये राहण्याची व्यवस्था होती. फिर्यादी ही आपले पतीसोबत खोलीला कुलुप लावुन चहा घेण्याकरीता रिसोर्ट कॅन्टीन मध्ये गेली नंतर चहा घेवुन बॅडमिडन खेळण्याकरीता गेली असता त्या दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे आराम करण्याचे खोलीच्या बाथरुम चे बाजुला अर्धवट खुले भिंतीवरुन खोलित आत प्रवेश करुन हॅन्डबॅग मध्ये ठेवलेले 1) 2 सोन्याच्या बांगडच्या प्रत्येकी 10 ग्रॅम प्रमाणे एकुण 20 ग्रॅम किंमती 1,00,000/–रु., 2) गळयातील सोन्याचा मंगळसुत्र त्याला 2 डोरले लावलेले 17 ग्रॅम किमती 85,000/–रु. 3) बॅगमध्ये ठेवलेले नगदी 2,000/–रु. असा एकुण कि. 1,87,000/– रु चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/बोरकुटे मो.क 9545667223 हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 किमी अंतरावर सोनेगावराजा ते गुमथळा रोड, कामठी येथे दिनांक 27/12/2020 चे 02.00 वा. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी कामठी यांच्यासह फिर्यादी नामे – पो.नाईक. दुर्गेश वरखडे हे जिल्हा गस्त दरम्यान पेट्रोलिंग करीत असता मौदा सोनेगाव राजावरून गुमथळा रोडवर येणारा एमच–31/सीक्यु–6669 क्रमांकाचा 6 चक्का ट्रकचा चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक आरोपी क्र– 1) राहुल हरिशचंद्र शहारे याने ट्रक मालक आरोपी क्र. 2) महेन्द्र आनंदराव ढोले याच्या सांगण्यावरून त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 2 ब्रास रेती किं. 6,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 2,06,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक दुर्गेश वरखडे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे 9764007720 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर